O/C.

महाराष्ट्र शासन

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE & HOSPITAL, AMBAJOGAI ,**

(OFFICE OF THE DEAN)

जा.क्र.स्वारातीग्राशावैमवरुअं/वस्त्र भांडार/ 464 /२०२२ दिनांक 28 /०१/२०२२

## लिनन साहित्य खरेदी करिता जाहिर दरपत्रक सुचना

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई करिता वेळोवेळी लागणारे लिनन साहित्य खरेदी करण्यासाठी त्यांचे दर सहा महिण्याच्या कालावधी करिता निश्चीत करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावे. सदरील दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक07 /02/२०२२ रोजी सांय. ०५.०० वा. पर्यंत असुन प्राप्त झालेले दरपत्रके दिनांक 08/02/२०२२ रोजी प्रशासकिय कार्यालयात खरेदी समिती समोर उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | दर | जीएसटी |
|---|---|---|---|
| १ | रेक्झीन ऊशी (साईज २ फुट बाय ०१ फुट जाडी ४ इंच) | | |
| २ | ओटीसाठी रेक्झीन गादया ३X६ फुट | | |
| ३ | हिरवे सर्जन गाऊन | | |
| ४ | पांढरे सर्जन गाऊन | | |
| ५ | हिरवे सर्जन शर्ट | | |
| ६ | हिरवे सर्जन पायजमा | | |
| ७ | पांढरे सर्जन शर्ट | | |
| ८ | पांढरे सर्जन पायजमा | | |

अटी व शर्ती

१. दरपत्रक धारकाने मुंबई व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी अद्यावत नोंदणीकरण असल्याचा दाखला/प्रमाणपत्र जोडावे.
२. दरपत्रक धारकांच्या पात्रता आयकर/प्राप्तीकर भरणा केल्याचे आर्थीक उलाढाल सक्षमतेसाठी मागील ०३ वर्षाचे सी.ए. कडुन तपासणी/ प्रमाणीत झालेला अहवाल (BALANCE SHEET) प्रत जोडावी.
३. दरपत्रक धारकाने पॅन क्रमांक प्रमाणपत्राची व जी.एस.टी. नोंदणी प्रमाण्पत्राची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी.
४. व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र तसेच ३१ मार्च २०२१ कर भरणा केल्याची चलन प्रत सोबत जोडावी.
५. दरपत्रक सादर करतांना दरपत्रकांच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक, जीएसटी व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सही व शिक्का असलेली दरपत्रके सादर करण्यात यावेत तसेच लिनन साहित्याच्या अं.क्र.

यादीनुसार सादर करण्यात यावेत व ज्या लिनन साहित्याचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या लिनन साहित्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) नमुद करावे.

६. दर हे सर्व करासहित नमुद करावेत. बाजार भावापेक्षा जास्त दर सादर करण्यात येऊ नये. तसेच सर्व लिनन साहित्य स्वत: स्वखर्चाने वीस दिवसाच्या आत वस्त्र भांडारात पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

७. दर हे पेनाने लिहिण्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्य करण्यात येईल. हस्तलिक्षीत दरपत्रके पुर्वसुचना न देता रद्य करण्यात येतील.

८. दरपत्रकाच्या मोहरबंद लिफाफयावर लिनन साहित्याचे दरपत्रक असे नमुद करण्यात यावे. व मोहरबंद लिफाफयावर दुकानाचे नाव संपुर्ण पत्ता मोबाईल नंबर लिहिण्यात यावा.

९. प्रशासकिय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

१०. पुरवठा करण्यात येणारे लिनन साहित्य हे वैद्य कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे. हलक्या किंवा निकृष्ट दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रदद करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

११. खरेदी प्राधिका-याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेचे एकल दरपत्रक देण्याबाबत “दरपत्रक धारकाची हमी” असे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

१२. काही तांत्रिक कारणास्त दरपत्रके स्विकारणे अथवा कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरितांनी राखुन ठेवला आहे.

१३. सदरील दरपत्रकाबाबत काही तक्रार असल्यास रु.२५०००/- (पंचेवीस हजार फक्त) धनादेश मा.अधिष्ठाता यांचे नावे जमा केल्यानंतरच तक्रार स्विकारण्यात येईल.

१४. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच दरपत्रके सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय
महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई

प्रत,

१. संस्थेची वेबसाईट, स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रुग्णालय, अंबाजोगाई

२. नोटीस बोर्ड, स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रुग्णालय, अंबाजोगाई

Checked & found correct
S.J.
28/1/2022.